Ref. No. 553/KVM/2022-23 Page: 01/02

माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटीचे

# दोशी वकील आर्ट्स कॉलेज ॲण्ड जी. सी. यु. बी. सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, गोरेगाव-रायगड

दि. ११/०८/२०२२

## सूचना

**महाविद्यालयातील सर्व अल्पसंख्यांक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारसी व जैन) समाजातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, परिपत्रक क्र. विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/ २०२२/1832 दि. २९/०७/२०२२ नुसार केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली, यांचे मार्फत अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे, या उद्देशाने अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सन २०२२-२०२३ मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नवीन मंजुरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (renewal) अर्ज ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**अर्ज भरण्यासाठी किमान पात्रता, अटी व लागणारे कागदपत्रे खालील प्रमाणे:**

**शैक्षणिक पात्रता:**

प्रथम/व्दितीय/तृतीय वर्ष बी.ए./बी.कॉम./बी.एस.सी. अभ्यासक्रम.

**किमान पात्रता व अटी:**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण उत्तीर्ण असावा.
३. अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २.०० लाख पर्यंत असावे.
४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीयोजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
५. नूतनीकरण्यासाठी विद्यार्थ्यास मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे. तसेच विदयार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच आभ्यासक्रमात असणे आवश्यक आहे.
६. एका कुटुंबातील फक्त दोन आपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघनकरून शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसूल केली जाईल.
८. विद्यार्थ्याने घेतलेला अभ्यासक्रम कमीत कमी १ वर्ष कालावधीचा असणे आवश्यक आहे.

M.T.E.S.Doshi Vakil A... G.C.U.B. Science and Commerce College GOREGAON RAIGAD 402 103

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:**

१. विद्यार्थ्याचा फोटो.
२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत(self-attested).
३. महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थी त्या महाविद्यालयात असल्याबाबतचे तसेच Day Scholars/Hosteller याबाबतची पडताळणी केल्याबाबतचे प्रपत्र (Institute Verification Form FAQs) सोबत देण्यात आलेला आहे.
४. पालकाचे राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकार्याचे/तहसील कार्यालयाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
५. अल्पसंख्यांक समुदायाबाबतचे स्वत: प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र, १८ वर्षाखालील विद्यार्थ्यासाठी त्यांच्या पालकांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.
६. महाविद्यालयास चालू वर्षाची फी भरल्याची पावती/रिसीप्ट.
७. बँक खाते पासबुकची प्रथम छायांकित प्रत.
८. रहिवासी प्रमाणपत्र. (Residential/Domicile Certificate)
९. आधार कार्ड छायांकित प्रत, तथापी एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्या एवजी त्या विद्यार्थ्याचे आधार नोंदणी आयडी किंवा बँक पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्याची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओल्खीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र इत्यादी यापैकी एक छायांकित प्रत जोडावी.

**अर्ज करण्याची पध्दत(नवीन मंजुरी / नुतनीकरण):**

१. पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.scholarship.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.
२. *National Scholarship Portal (NSP) या मोबाईल अॅप सुविधा देखील अर्ज भरण्यासाठी* देण्यात आलेली आहे.
३. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी उपरोक्त संकेतस्थळावर HOMEPAGE वरील GUIDELINES व FREQUENTLY ASKED QUESTIONS (FAQ) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.
४. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि. ३१ ऑक्टोबर २०२२** अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.
५. विद्यार्थ्यांनी त्यांच्या ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या हार्ड कॉपीसोबत सदर कागदपत्रे महाविद्यालयात अर्ज तपासणीसाठी **दि. ३१ ऑक्टोबर २०२२** पर्यंत सादर करावी.

सूचना व संबधित परिपत्रक सूचनाफलकावर लावलेले आहे. अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

Sayyed Shoeb Rashid
M. 9921015349

M.T.E.S. Doshi Vakil Arts College & G.C.U.B. Science and Commerce College
GOREGAON
RAIGAD
402 103

PRINCIPAL
Mangaon Taluka Education Society's
Doshi Vakil Arts College and
G.C.U.B. Science & Commerce College
Goregaon-Raigad (402 103)